# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३६६६**

**अपिलार्थी श्री. मेहुल हरिया**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी, श्रेणी- २**

सहकार कक्ष, झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक**

सहकार कक्ष, झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-५१.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १७.०३.२०२६</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०१.०८.२०२४ | २६.०९.२०२४, १२.११.२०२४ | १८.११.२०२४ | ०५.०२.२०२५ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १९.१२.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश पारित केलेले नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २६.०९.२०२४, दि.१२.११.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थीनी दि. ०१.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना दि. ०७.०५.२०२४ लिहिलेल्या पत्रावर करण्यात आलेल्या कार्यवाहीविषयी गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना दि. २६.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती ही आपल्या कार्यालयाशी संबंधित असल्याने सदर माहिती अर्ज आपल्या कार्यालयात वर्ग करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दि. १२.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, सदर माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १८.११.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी त्यांचे दि.१४.०३.२०२६ रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर करुन नमूद केले की, त्यांचा ऑनलाईन माहिती अर्ज गृहनिर्माण विभाग यांच्याकडे सादर केला होता कारण की, ऑनालईन प्रणालीमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन

..२/-

प्राधिकरण यांच्याकडे माहिती अर्ज सादर करण्याची सुविधा नाही व त्यांनी श्री. जी. एस. मगर यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना लिहिलेल्या पत्रावर कार्यवाही करण्याची मागणी केली. तसेच जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये ४२ प्रकरण एकत्रित करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे हस्तांतरित करुन त्यांना कळविले आहे. परंतु सदर हस्तांतरण जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर फार उशिराने केले गेले. तसेच एकत्रित हस्तांतरण करणे योग्य नाही तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहीत मुदतीत सुनावणी घेतलेली नाही.

४. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. ०४.०३.२०२६ रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर करुन नमूद केले की, अपिलार्थी याचा शासनाकडे सादर करण्यात आलेला माहिती अर्ज त्यांच्या कार्यालयात दि.२९.१०.२०२४ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीना दि. १२.११.२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, त्यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०२.२०२५ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारित केले की, सदर मूळ माहिती अर्ज सहाय्यक अभियंता टी विभाग यांना वर्ग करण्यात यावा. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थींचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता टी विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे वर्ग केलेला आहे.

५. सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, सदर प्रकरण दुय्यम अभियंता टी विभाग यांच्याकडे प्रलंबित आहे. तरी दुय्यम अभियंता टी विभाग यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी, दुय्यम अभियंता टी विभाग यांनी अपिलार्थीना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०९.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

17-3-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १७.०३.२०२६**

प्रत - जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता टी विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांनी पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.
(जन माहिती अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता टी विभाग यांना उपस्थित राहण्याकरिता कळवावे)

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३६६६**
**अपिलार्थी श्री. मेहुल हरिया**
**सुनावणी दिनांक : ०९.०४.२०२६ (In continuation of order dt.१७.०३.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| अपिलार्थी | : | उपस्थित(व्ही.सी.व्दारे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी (व्ही.सी.माध्यमाव्दारे) व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आजच्या प्रकरणातील माहिती अर्जाचा विषय व अपील क्र. २१२२/२०२४ मधील माहिती अर्जाचा विषय एकसारखा आहे. अपील क्र. २१२२/२०२४ मध्ये आयोगाने दि. ०३.११.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अंतीम आदेश पारित केलेले आहेत. या कारणामुळे सदर प्रकरणी कोणतेही वेगळेने आदेश अपेक्षित नाहीत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : १०.०४.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**